माहे एप्रिल-२०२० ते मे, २०२१ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या एकूण ८६ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या ना.मा.प्र. आरक्षणाच्या सोडतीकरिता **सुधारित आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२१**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक रानिआ/नपं-२०२१/प्र.क्र.३/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९/११/२०२१.

प्रति,

जिल्हाधिकारी, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सोलापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली. (एकूण २८)

**विषय :- माहे एप्रिल-२०२० ते मे, २०२१ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या एकूण ८६ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या ना.मा. प्र. आरक्षणाच्या सोडतीकरिता सुधारित आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२१.**

**संदर्भः**-१) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-०६,दि.०६/०२/२०२० चे आदेश.
२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी सुधारणा अध्यादेश क्रमांक ६/२०२१ दि.०१/१०/२०२१.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०२/०३/२०२० रोजीच्या प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रमानुसार **एका** नगरपंचायतीची, दि.१२/०२/२०२० रोजीच्या कार्यक्रमानुसार ६४ नगरपंचातींची, दि.२९/१०/२०२० रोजीच्या कार्यक्रमानुसार १६ नगरपंचायतींची व दि.१८/०१/२०२१ रोजीच्या कार्यक्रमानुसार ५ नगरपंचायतीच्या अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात यापूर्वीच प्रसिध्द झालेल्या आहेत. अशा एकूण ८६ नगरपंचायतींच्या मुदती माहे एप्रिल-२०२० ते मे, २०२१ या कालावधीत समाप्त झालेल्या असून या नगरपंचायतींच्या (सोबत परिशिष्ट-२) सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार घेणे आवश्यक आहे.

२. तसेच यातील ८१ नगरपंचायतींचा मतदार यादीचा कार्यक्रम दि.०२/०२/२०२१ रोजी जाहीर करण्यात आला आणि ५ नगरपंचायतींचा मतदार यादी कार्यक्रम दि.३०/०३/२०२१ रोजी जाहीर करण्यात आला. परंतु कोरोना संसर्गामुळे शासनाने घातलेल्या निर्बंधामुळे प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

३. दरम्यानच्या काळात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ९८०/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४/०३/२०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटीशन (सिव्हील) क्र.३५६/१९९४ श्री. डॉ. के. कृष्णमूर्ती विरूध्द केंद्र शासन मध्ये दि.११/०५/२०१० रोजी दिलेल्या निवाड्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० % च्या मर्यादेत आरक्षण देण्याचे निदेश दिले आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२ (२) (क) मधील तरतूद त्यानुसार बदलली (read down केली). तसेच सदर प्रमाण इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू होईल असेही म्हटले.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासनाने दि.२९ जून २०२१ रोजी मागासवर्ग आयोग गठीत केला आहे. तसेच शासनाने दिनांक ०१/१०/२०२१ महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश क्रमांक ६/२०२१, प्राख्यापित केला आहे. त्यानुसार नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, नगरपंचायतीतील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील, आणि एकूण आरक्षण नगरपरिषदेतील एकूण जागांच्या ५० टक्यांपेक्षा अधिक असणार नाही. परंतु अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक द्वितीयांश जागा, नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

५. या अध्यादेशानुसार या ८६ नगरपंचायतींच्या बाबत महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदींनुसार विभागीय आयुक्तांनी यापूर्वी प्रख्यापित केलेली २७ टक्के ना.मा.प्र. आरक्षण सदस्य संख्या ही वरील अध्यादेशातील तरतुदीनुसार तपासणे आवश्यक झाले आहे. आयोगाने ही माहिती तपासली असता ५० नगरपंचायतींमध्ये आरक्षण मर्यादा ५० टक्क्यापुढे जात असल्याचे निदर्शनास आले असून तेथील

ना.मा.प्र.च्या जागा कमी करणे आवश्यक आहे. आयोगाने याबाबत व्हीडिओ कॉन्फरन्सद्वारे सर्व ८६ मुख्याधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून याची खात्री करून घेतलेली असून, या ५० नगरपंचायतींची यादी सोबत जोडलेली आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील नगरपंचायतींच्या नामाप्र आरक्षणाबाबतची सदस्य संख्या वरील अध्यादेशानुसार तपासून अध्यादेशाचे उल्लंघन होणार नाही याची खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत ना.मा.प्र.सह एकूण आरक्षण हे ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत राहील याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

त्यानुसार मर्यादा ओलांडणाऱ्या नगरपंचायतींची ना.मा.प्र. सदस्य संख्येबाबत आणि त्यानुसार जादा ना.मा.प्र. सदस्यांचे खुला (महिला) आणि खुला यांची संख्यादेखील शुध्दीपत्रकाद्वारे दुरूस्ती करून संबंधीत विभागीय आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

६. त्यामुळे आता या पत्राद्वारे माहे एप्रिल-२०२० ते मे, २०२१ मध्ये मुदती समाप्त झालेल्या ८६ नगरपंचायतींमधील वरील परिच्छेद ५ नुसार होणाऱ्या बदलाचा अंमल करण्यासाठी **<u>आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम</u> परिशिष्ट-१** नुसार देण्यात येत आहे.

७. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिला याकरिता सोडत काढताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. :-

(i) **राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिशिष्ट-२** मध्ये नमूद केलेल्या एकूण **८६** नगरपंचायतींची मुदत माहे एप्रिल-२०२० ते मे-२०२१ या कालावधीत समाप्त झालेल्या आहेत.

(ii) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिला याकरिता सोडत, जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार काढावी.

(iii) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A4 या आकाराचा असावा.चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन

दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

(v) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम आरक्षण इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी.

८. मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडीपीठात दाखल रिट याचिका क्रमांक ११७४४/२०२१ द्वारे राज्य शासनाने दि.२३/०९/२०२१ रोजी पारीत केलेला अध्यादेश क्र.३/२०२१ आव्हान देण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर याचिकेत न्यायालयाने दि.२२/१०/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाचा विचार करता, आयोगातर्फे करण्यात येणारी सर्व कार्यवाही ही उक्त याचिकेतील निर्णयाच्या अधीन असेल, याची कृपया नोंद घ्यावी.

९. राज्यामध्ये कोरोना विषाणूची (कोव्हीड-१९) महामारी सुरु असल्याने केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषांचे तंतोतंत पालन करुन नमूद नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी **आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२१** राबवतेवेळी आवश्यक त्या उपाय योजना राबविण्यात याव्यात.

१०. वरील परिच्छेदात नमूद परिस्थितीमुळे आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दि.०१/०१/२०२२ या अर्हता दिनांकावार आधारीत मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम दिलेला असून या कार्यक्रमानुसार दि.०१/११/२०२१ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

परिच्छेद २ मधील मतदार यादी कार्यक्रम हा दि.१५/०१/२०२१ रोजीच्या अर्हता दिनांकावर आधारीत होती. आता लगतची म्हणजे दि.०१/११/२०२१ रोजीची अद्ययावत मतदार यादी उपलब्ध असल्याने ८६ नगरपंचायतींसाठी नव्याने मतदार यादी कार्यक्रम देण्यात येईल. सबब यापूर्वी दिलेले दि.०२/०२/२०२१ व दि.३०/०३/२०२१ रोजीचे मतदार यादी कार्यक्रम याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

११. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहे:-

दूनध्वनी क्रमांक :- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०

ई-मेल :- sec.mh@gov.in

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

प्रत:-

१. प्रधान सचिव ,(२)नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, (सर्व)
४. संबंधित नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
६. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
७. निवड नस्ती/कार्या-६.

# परिशिष्ट -१

**माहे एप्रिल-२०२० ते मे, २०२१ मध्ये मुदत समाप्त झालेल्या एकूण ८६ नगरपंचायतींपैकी काही नगरपंचायतीमध्ये ना.मा.प्र. च्या जागा धरुन आरक्षणाच्या एकूण जागा ५०% च्या वर जात असल्यामुळे या नगरपंचायतींसाठी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम -२०२१.**

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.३/का-०६, दि. ०९/११/२०२१ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | सदस्य पदांच्या (ना.मा.प्र.) आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी नगरपंचायतीच्या वेबसाईटसह)** | **जिल्हाधिकारी** | **१०/११/२०२१ (बुधवार)** |
| २. | नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या (ना.मा.प्र.) आरक्षणाची सोडत काढणे. (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | **मुख्याधिकारी** | **१२/११/२०२१ (शुक्रवार)** |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | नगरपंचायतीतील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला आरक्षणाची (अधिसूचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | **जिल्हाधिकारी** | **१२/११/२०२१ (शुक्रवार) पर्यंत** |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | **१२/११/२०२१ (शुक्रवार) ते १६/११/२०२१ (मंगळवार) पर्यंत** |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | **जिल्हाधिकारी** | **१७/११/२०२१ (बुधवार) पर्यंत** |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन**, यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १८/११/२०२१ (गुरुवार) पर्यंत |
| ५. | ना.मा.प्र. व त्या मधील महिला तसेच सर्व साधारण प्रवर्गातील महिलांच्या अंतिम आरक्षणास मान्यता देणे. | **संबंधित विभागीय आयुक्त** | २२/११/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| ६. | अधिनियमातील कलम १० नुसार ना.मा.प्र. व त्या मधील महिला तसेच सर्व साधारण प्रवर्गातील महिलांच्या अंतिम आरक्षणाबाबत अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २३/११/२०२१ (मंगळवार) पर्यंत |

**टीपः- सोडत काढण्यात येणाऱ्या नगरपंचायतीच्या आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# परिशिष्ट - २

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.३/का-६, दि. ०९/११/२०२१ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | अ.क्र. | नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | १ | मुरबाड | २९/११/२०२० |
| | | २ | शहापूर | २९/११/२०२० |
| २ | रायगड | ३ | खालापूर | २४/०१/२०२१ |
| | | ४ | तळा | २४/०१/२०२१ |
| | | ५ | माणगाव | २४/०१/२०२१ |
| | | ६ | म्हसळा | २४/०१/२०२१ |
| | | ७ | पोलादपूर | २४/०१/२०२१ |
| ३ | रत्नागिरी | ८ | मंडणगड | २६/११/२०२० |
| ४ | सिंधुदुर्ग | ९ | कसई-दोडामार्ग | २३/११/२०२० |
| | | १० | वाभवे-वैभववाडी | २३/११/२०२० |
| | | ११ | कुडाळ | ११/०५/२०२१ |
| ५ | सातारा | १२ | लोणंद | ०३/०५/२०२१ |
| ६ | सोलापूर | १३ | माढा | ०८/०५/२०२१ |
| | | १४ | माळशिरस | ०८/०५/२०२१ |
| ७ | नाशिक | १५ | निफाड | २९/११/२०२० |
| | | १६ | पेठ | २९/११/२०२० |
| | | १७ | देचळा | २९/११/२०२० |
| | | १८ | कळवण | २९/११/२०२० |
| | | १९ | सुरगाणा | २९/११/२०२० |
| | | २० | दिंडोरी | २९/०१/२०२१ |
| ८ | धुळे | २१ | साक्री | २६/११/२०२० |
| ९ | नंदुरबार | २२ | धडगाव-वडफळ्या-रोषणमाळ | ०८/०२/२०२१ |
| १० | अहमदनगर | २३ | अकोले | २५/११/२०२० |
| | | २४ | कर्जत | २५/११/२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २५ | पारनेर | २५/११/२०२० |
| ११ | औरंगाबाद | २६ | सोयगांव | २६/११/२०२० |
| १२ | जालना | २७ | बदनापूर | २३/११/२०२० |
| | | २८ | जाफ्राबाद | २३/११/२०२० |
| | | २९ | मंठा | २३/११/२०२० |
| | | ३० | घनसावंगी | २३/११/२०२० |
| १३ | परभणी | ३१ | पालम | २६/११/२०२० |
| १४ | बीड | ३२ | केज | ०१/०५/२०२० |
| | | ३३ | शिरुर-कासार | २६/११/२०२० |
| | | ३४ | वडवणी | २६/११/२०२० |
| | | ३५ | पाटोदा | २६/११/२०२० |
| | | ३६ | आष्टी | २६/११/२०२० |
| १५ | लातूर | ३७ | जळकोट | २६/११/२०२० |
| | | ३८ | चाकुर | २६/११/२०२० |
| | | ३९ | देचणी | २६/११/२०२० |
| | | ४० | शिरुर-अनंतपाळ | २६/११/२०२० |
| १६ | उस्मानाबाद | ४१ | वाशी | २४/०१/२०२१ |
| | | ४२ | लोहारा बु. | ०६/०५/२०२१ |
| १७ | नांदेड | ४३ | हिमायतनगर | २४/०१/२०२१ |
| | | ४४ | नायगाव | २४/०१/२०२१ |
| १८ | हिंगोली | ४५ | सेनगाव | ०२/०२/२०२१ |
| | | ४६ | औंढा-नागनाथ | ०२/०२/२०२१ |
| १९ | अमरावती | ४७ | भातकुली | २९/११/२०२० |
| | | ४८ | तिवसा | २९/११/२०२० |
| | | ४९ | धारणी | २९/११/२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ५० | नांदगाव-खांडेश्वर | २९/११/२०२० |
| २० | बुलढाणा | ५१ | संग्रामपूर | २५/११/२०२० |
| | | ५२ | मोताळा | २५/११/२०२० |
| २१ | यवतमाळ | ५३ | महागाव | २६/११/२०२० |
| | | ५४ | कळंब | २६/११/२०२० |
| | | ५५ | बाभुळगाव | २६/११/२०२० |
| | | ५६ | राळेगाव | २६/११/२०२० |
| | | ५७ | मारेगाव | २६/११/२०२० |
| २२ | वाशिम | ५८ | मानोरा | ०७/०२/२०२१ |
| २३ | नागपूर | ५९ | हिंगणा | २६/११/२०२० |
| | | ६० | कुही | २६/११/२०२० |
| | | ६१ | भिवापूर | २६/११/२०२० |
| २४ | वर्धा | ६२ | कारंजा | २९/११/२०२० |
| | | ६३ | आष्टी | २९/११/२०२० |
| | | ६४ | सेलू | २९/११/२०२० |
| | | ६५ | समुद्रपूर | २९/११/२०२० |
| २५ | भंडारा | ६६ | मोहाडी | २९/११/२०२० |
| | | ६७ | लाखनी | २९/११/२०२० |
| | | ६८ | लाखांदूर | २९/११/२०२० |
| २६ | गोंदिया | ६९ | सडकअर्जुनी | २६/११/२०२० |
| | | ७० | अर्जुनी | २६/११/२०२० |
| | | ७१ | गोरेगाव | २६/११/२०२० |
| | | ७२ | देवरी | २६/११/२०२० |
| २७ | चंद्रपूर | ७३ | सावली | २९/११/२०२० |
| | | ७४ | पोंभुर्णा | २९/११/२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ७५ | गोंडपिपरी | २८/०२/२०२१ |
| | | ७६ | कोरपना | २८/०२/२०२१ |
| | | ७७ | जिवती | २८/०२/२०२१ |
| | | ७८ | मुलचेरा | २५/११/२०२० |
| | | ७९ | एटापल्ली | २५/११/२०२० |
| | | ८० | कोरची | २५/११/२०२० |
| | | ८१ | अहेरी | २५/११/२०२० |
| | | ८२ | चामोर्शी | २९/११/२०२० |
| | | ८३ | सिरोंचा | २९/११/२०२० |
| | | ८४ | धानोरा | २९/११/२०२० |
| | | ८५ | कुरखेडा | २९/११/२०२० |
| २८ | गडचिरोली | ८६ | भामरागड | २९/११/२०२० |
| | **एकूण** | | **८६** | |